आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड

शनिवार, २१ जून २०२५ | Saturday 21 June 2025

# गोव्यातल्या १२२ घरांना मिळणार ‘हेरिटेज’ दर्जा !

## राज्य वारसा धोरण अंमलबजावणीला सरकारची मंजूरी : टप्प्याटप्प्याने होणार अंमलबजावणी

टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २० : गोवा सरकारचे नवे राज्य वारसा धोरण २०२५ येत्या पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने राबवले जाईल, अशी माहिती पुरातत्व मंत्री सुभाष फळदेसाई यांनी गुरुवारी दिली. पर्वरी येथील मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**



फळदेसाई यांनी सांगितले की, या धोरणाअंतर्गत राज्यभरातील एकूण १२२ वारसा घरे ओळखली गेली असून त्यांचा जीर्णोद्धार आणि देखभाल केली जाणार आहे. त्यांनी स्पष्ट केले की सरकार या ऐतिहासिक वास्तूंच्या मालकांच्या सहकार्याने महसूल वाटप मॉडेल तयार करण्याच्या प्रक्रियेत असून, त्यामुळे या वारशाचा शाश्वत वापर आणि व्यवस्थापन शक्य होईल.

हे धोरण पाच वर्षांच्या कालावधीत लागू करण्यात येईल. त्यानंतर त्याचा पुनरावलोकन केला जाईल. गावागावात पडलेल्या प्राचीन वास्तू आणि वस्तूंचेही सर्वेक्षण करण्यात येईल आणि त्यावर आधारित संशोधनाच्या आधारे योग्य कागदपत्रे तयार केली जातील, असे फळदेसाई यांनी स्पष्ट केले.


त्यांनी सांगितले की, वारसा घरे ही गोव्याच्या ओळखीचा अविभाज्य भाग असून त्यांचे केवळ जतनच नव्हे तर त्यांचा स्थानिक संस्कृती आणि पर्यटनात अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

हे धोरण सहा प्रमुख विभागांमध्ये विभागले आहे . जागतिक आणि राष्ट्रीय धोरण चौकटीचा आढावा, कायदेशीर चौकट, मुख्य व्यवस्थापन क्षेत्र, वारसा व्यवस्थापनासाठी मार्गदर्शक तत्त्वे, कृती योजना आणि अंमलबजावणी धोरण, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

राज्यातील वारसा घरांचे जतन ही एक सामायिक जबाबदारी असल्याचे सांगत, मंत्री फळदेसाई म्हणाले की, या योजनेद्वारे घरमालकांना पाठिंबा दिला जाईल आणि या सांस्कृतिक ठेव्यांचा जनतेला सुलभ आणि सन्मानपूर्वक प्रवेश मिळावा याचीही काळजी घेतली जाईल.

या धोरणाची अंमलबजावणी करताना १२२ वारसा वास्तू, ४६ पारंपरिक लोककला प्रकार आणि ६१ पारंपरिक व्यवसायांचे पुनर्संचयित करण्याचा मानस सरकारने व्यक्त केला आहे.

या उपक्रमामुळे गोव्यातील वारसा पर्यटनाला चालना मिळेल, स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती होईल आणि गोव्याच्या विशिष्ट इंडो–पोर्तुगीज वास्तुकलेचे जतन सुनिश्चित होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.




## पाळीव कुत्र्यावर एअरगनने गोळीबार

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २० :** नावेली मधील बेले परिसरात एका पाळीव कुत्र्यावर एअरगनने गोळ्या झाडून केल्या गेलेल्या क्रूर हल्ल्यामुळे स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आल्यानंतर पोलिसांवर दबाव वाढला असून अखेर आरोपीविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही घटना १९ जून रोजी घडली असून, पीडित कुत्र्याची मालकीण व्हॅलेंटिना व्हिएरा यांनी गुरुवारी मडगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या शेजाऱ्याने, जोविटो फर्नांडिस (वय २०), याने पाळीव कुत्र्यावर तब्बल चार गोळ्या झाडल्या असे तिचे म्हणणे आहे . त्यापैकी तीन पोटात आणि एक डोक्यात घुसली. गंभीर जखमी झालेल्या कुत्र्यावर सध्या पशुवैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेची दखल घेत, व्हिएरा यांनी जिल्हा प्राणी क्रूरता प्रतिबंधक सोसायटी कडेही तक्रार दाखल केली. त्यानंतर मडगाव पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३२५ आणि प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायद्याच्या कलम ११(१)(क) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## घरगुती कामगारांना कायदेशीर मान्यता द्या !

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २० :** आंतरराष्ट्रीय घरगुती कामगार दिनानिमित्त मडगाव येथील होली स्पिरिट चर्च हॉलमध्ये गोव्यातील घरगुती कामगारांनी एकत्र येत आपले हक्क आणि संरक्षण मिळावे, यासाठी जोरदार मागणी केली. घरगुती कामगार चळवळ गोवा’ व राष्ट्रीय घरगुती कामगार चळवळीशी संलग्न संघटनांच्या पुढाकाराने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

या वेळी एकमताने एक ठराव मंजूर करण्यात आला, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या घरगुती कामगार विधेयक’ची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली.

कार्यक्रमात टार्सिला आयसीएम आणि शांता यांच्या मार्गदर्शनाखाली घरगुती कामगारांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांवर चर्चा झाली. यामध्ये कामाच्या ठिकाणी कायदेशीर सुरक्षा, सामाजिक लाभांचा अभाव आणि असंघटित क्षेत्रासाठीच्या दुर्लक्षित धोरणांचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

या निमित्ताने ’बायलांचो साद*च्या ॲड. डॉ. सबिना मार्टिन्स यांनी २०११ मध्ये स्वीकारलेल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या कन्व्हेन्शन १८९ चे स्मरण करून देताना, घरगुती कामगारांना कायद्याने संरक्षण मिळालेला, सन्माननीय कामगार वर्ग म्हणून मान्यता देणे ही काळाची गरज असल्याचे ठासून सांगितले. गोव्यात अद्यापही अशा कामगारांसाठी कोणताही स्पष्ट कायदा अस्तित्वात नाही. देशातील ११ राज्यांनी याबाबत प्रगती केली असताना गोव्यात विधेयकाचा मसुदाही तयार झालेला नाही. कामगार कल्याण मंडळात असलेला निधीही या वर्गासाठी अजूनही अप्राप्य आहे, असे डॉ. मार्टिन्स यांनी स्पष्ट केले.

## इंडोको फार्माच्या भरती धोरणाचा आ. सरदेसाईंकडून तीव्र निषेध

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २० :** औषधनिर्माण क्षेत्रातील प्रमुख कंपनी इंडोको रेमेडीज लिमिटेडने गोव्यातील नोकरीसाठी भरती प्रक्रिया जाहीर केली असली, तरी मुलाखती मात्र राज्याबाहेर आयोजित केल्यामुळे राज्यात तीव्र नाराजी आहे. या निर्णयाला स्थानिक तरुण नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय प्रतिनिधींनी जोरदार विरोध दर्शविला असून, ही पद्धत स्थानिक तरुणांच्या भविष्यासाठी घातक असल्याचे स्पष्ट केले आहे.

फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी या निर्णयावर तीव्र टीका करत इंडोकोच्या धोरणाला गोव्यातील तरुणांचा भयानक विश्वासघात असे संबोधले.

इंडोकोसारख्या कंपन्या गोव्यातच कार्यरत असताना, गोव्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी नाकारतात, ही बाब धक्कादायक आहे. यावरून राज्य सरकार स्थानिक जनतेबद्दल किती उदासीन आहे, हे स्पष्ट होते, असे सरदेसाई म्हणाले.

त्यांनी असा इशाराही दिला की, ही केवळ एका कंपनीची बाब नसून, औषध क्षेत्रात स्थानिक भरती टाळण्याचा एक अपायकारक ट्रेंड निर्माण झाला आहे. आम्ही सातत्याने गोव्यातील उमेदवारांसाठी नोकरी आरक्षणाची मागणी करत आलो आहोत. सरकारने यावर आता ठोस कारवाई केली नाही, तर कंपन्या याच पद्धतीने स्थानिकांचे हक्क झुगारत राहतील,असा इशारा त्यांनी दिला.

गेल्या वर्षी अशाच प्रकारच्या भरती प्रक्रियेवर जोरदार निषेध नोंदवल्यानंतर इंडोकोला त्या मुलाखती मागे घ्याव्या लागल्या होत्या. मात्र यंदाही कंपनीने तीच भूमिका घेतल्यामुळे पुन्हा संतापाची लाट उसळली आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय शिरोडकर यांनी इंडोकोला पुनरावृत्ती करणारा गुन्हेगार असे संबोधले आणि सरकारवर गंभीर आरोप केले.गेल्यावेळी ज्या दबावामुळे कंपनीने पावले मागे घेतली, तोच दबाव पुन्हा टाकावा लागणार आहे. सरकारच्या निष्क्रियतेमुळेच या कंपन्यांना असे आत्मविश्वासाने वागण्याची हिंमत होते, असे ते म्हणाले.

दरम्यान, गोवा युवा रोजगार मंचाचे प्रवक्ते क्रिस्टोफर डिसोझा यांनीही या धोरणाचा निषेध करत याला रणनीतिक आणि लज्जास्पद निर्णय म्हटले. गोव्यातील नोकऱ्यांसाठी गोवाबाहेर मुलाखती घेतल्याने स्थानिक उमेदवारांना अर्ज करण्यापूर्वीच बाजूला टाकले जाते. ही प्रक्रिया अन्यायकारक आणि हेतुपुरस्सर आहे,असे डिसोझा म्हणाले.

युवा संघटनांनी तसेच विविध कार्यकर्त्यांनी सरकार आणि इंडोको या दोघांनाही इशारा दिला आहे की, जोपर्यंत ही भरती प्रक्रिया पुन्हा गोव्यात राबवली जात नाही आणि स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जात नाही, तोपर्यंत तीव्र जनआंदोलन उभारले जाईल.

आम्ही स्पष्टपणे सांगतो , गोव्यातील तरुणांच्या रोजगाराच्या हक्कांवर गदा आणणाऱ्यांना आम्ही गप्प बसून माफ करणार नाही, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.




## बेकायदेशीर वाळू उपशामुळे पुराचा धोका वाढला

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २० :** खांडेपार नदीत गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेली मातीची धूप यंदाही थांबलेली नाही. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी बागा परिसरात नदीच्या काठावर सुमारे १२ मीटर भाग कोसळला होता. सध्या धाड्यार खांडेपार येथील गलेर परिसरातही अशाच प्रमाणात विरुद्ध बाजूने मातीची धूप झाल्याचे स्पष्ट झाले आहे.



स्थानिक नागरिकांनी सांगितले की, खांडेपार नदी दरवर्षी दोन ते तीन मीटरपर्यंत भूभाग ’खात’ असून, विशेषतः वाळू उपसा बिंदूंवर नदीचे पात्र सातत्याने रुंद होत आहे. यामागे सक्शन पंपच्या साहाय्याने सुरू असलेला बेकायदेशीर वाळू उपसा हा प्रमुख कारण असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जर हा वाळू उपसा थांबवला गेला नाही, तर भविष्यात या भागाला गंभीर पूरस्थितीला सामोरे जावे लागेल, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे. प्रत्येक पावसाळ्यात या नदीला पूर येतो आणि त्याचा थेट परिणाम परिसरातील घरे व शेतजमिनींवर होतो. यासंदर्भात स्थानिकांनी यापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर काही ठिकाणी तपासणीही झाली होती आणि मोठ्या प्रमाणावर साचलेली वाळू जप्त करण्यात आली होती.

स्थानिकांच्या मते, नदीकाठच्या सुमारे ५०० मीटरच्या तीव्र वळणावर वाळू उपशाची शक्यता अधिक आहे. हा भाग दर्जेदार वाळूसाठ्यांसाठी ओळखला जातो. त्यामुळे बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्यांसाठी हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र बनले आहे, असे एका रहिवाशाने सांगितले. मात्र, यामुळे नदीचे पात्र अजूनही रुंदावत असून, परिणामी परिसरात पूरस्थिती ओढवण्याचा धोका वाढत आहे.

स्थानिकांनी प्रशासनाकडे याबाबत तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. त्यांनी नदीपात्रात होत असलेल्या बेकायदेशीर हस्तक्षेपावर कायमस्वरूपी बंदी घालण्याचे आवाहन केले असून, संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

**VILLAGE PANCHAYAT NAVELIM, BICHOLIM**

Ref. No: VP / NVM / BICH / Library / Post / 25-26 / 262 Date: 20/06/2025

**ADVERTISEMENT FOR THE POST OF JUNIOR LIBRARIAN AND LIBRARY ATTENDANT**

Application are invited on plain paper with self-attested copies of certificates from the eligible candidate by the Sarpanch, Village Panchayat Navelim, Bicholim, Goa for filling up the below mentioned post to be filled at the Village Panchayat Library Navelim of Village Panchayat Navelim, Bicholim, Goa

Details of Post and Eligibility are as under:

**Sr. No.** 1. **Name of Post:** Junior Librarian **Total No. of Posts & Category:** 01 (UR) **Pay Band as per 6th Pay Commission**: 5200-20200+1900 (GP) **Education & Other Qualification:** **Essential** (1) Higher Secondary School Certificate of Recognized Board (2) Certificate Course in Library & Information Science from any Recognized Institute. (3) Knowledge of Konkani **Desirable** (1) Knowledge of Marathi

**Sr. No.** 2. **Name of Post:** Library Attendant **Total No. of Posts & Category:** 01 (UR) **Pay Band as per 6th Pay Commission**: 5200-20200+1800 (GP) **Education & Other Qualification:** **Essential** (1) S.S.C. passed from any recognized Board. (2) Knowledge of Konkani **Desirable** (1) Knowledge of Marathi

**A.** Age limit prescribed: Not exceeding 45 years as on last date of the Receipt of Application. (Relaxable for Government servants and reserved categories candidates i.e. ST/OBC/SC/Ex-Serviceman/PH in accordance with the instructions or orders issued by the Government from time to time)

**B.** Interested and eligible candidate may submit their application giving the details such as. 1. Full Name and Address with mobile number 2. Date of Birth 3. Education Qualification 4. Employment Exchange Registration Number supported with the self-attested copies of Education Qualification, Birth Certificate, experience certificate, valid Employment exchange registration card, certificate of 15 years residence in Goa issued by the Mamlatdar along with latest passport size photograph, as to submit the same through physical mode on or before 11.07.2025 till 5.00 pm. No application shall be accepted/considered after the last date of application. No application shall be accepted in any other mode.

**C.** It may be noted that incomplete application and application without accompanying the supporting testimonials mentioned above and the application received after prescribe date will not be entertained but summarily rejected. All above certificates are subject to verification.

**D.** This Village Panchayat Navelim, Bicholim, Goa reserves the right to cancel the recruitment process at any time without any further notice and without assigning any reason thereof.

Seal Sd/- **Rohidas H. Kansekar (Sarpanch) Village Panchayat Navelim, Bicholim**